


सा. बीड
# गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक ज्ञानेश्वर लंगे मो 9763521855

## माजलगाव मतदार संघाचे उज्वल भविष्य

वाचा पान 3 वर

बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 10 वा | बुधवार, दि. 30 ते 05 जानेवारी 2025 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किमत 2 रु |
BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | ISSUE 9 | tuesday, 25 To 31 DEC 2024 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs 2 रु |










॥ जीवेत शरदः शतम् ॥
आमचे लाडके नेते
जयसिंग भैय्या सोळंके
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
संतोष आबा कदम
सरपंच पिंपळटक्का
उपसरपंच, सन्माननीय सर्व सदस्य
ग्रामपंचायत कार्यालय पिंपळटक्का ता. वडवणी.


आमचे लाडके नेते
जयसिंग भैय्या सोळंके
यांना वाढदिवसाच्या
॥ हार्दिक शुभेच्छा ॥
शुभेच्छुक
अभिमान अर्जुन कदम
संचालक बाजार समिती, वडवणी


युवा नेते
जयसिंग भैय्या सोळंके
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
अशोक किसनराव निपटे
मा. सरपंच,
उपसरपंच पिंपरखेड


आमचे लाडके नेते
जयसिंग भैय्या सोळंके
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
अंगद नाना लंगे
उस बागायतदार शेतकरी
राजेभाऊ अण्णा लंगे
युवा नेते

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड **गादर** नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा

संपादक ज्ञानेश्वर लंगे मो 9763521855

सर्वसामान्यांच्या
मनामनात
मिळवले स्थान



# माजलगाव मतदार संघाचे उज्वल भविष्य

**शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी... या संत पंक्तीचा प्रत्यय सोळंके कुटुंबाकडे पाहिलं की येतो. लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी महाराष्ट्राच्या राजगादीवर पंधरा वर्षे मंत्री पद भूषवलं. उपमुख्यमंत्री पद भूसविल्यानंतरही मी पणा.. गर्व या घराला कधीही शिवला नाही. म्हणूनच त्यांचे सुपुत्र प्रकाश दादा आणि धैर्यशील काका यांनी जनमानसात राहून मतदारसंघात राजकारण केलं. लोकांचे मन सांभाळून जनसेवेचा वसा या दोन्ही भावांनी आतापर्यंत जपला. आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकत आज तिसऱ्या पिढीतील युवा नेतृत्व जयसिंह भैय्या सोळंके आपली वाटचाल करत आहेत. माजलगाव मतदार संघाचे भविष्य म्हणून या चेहऱ्याकडे पाहिलं जात आहे.**

**आपल्या आजोबा, चुलते आणि वडिलांप्रमाणेच कर्तृत्व गाजवणारा जयसिंग भैय्या सोळंके यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मन भरून शुभेच्छा मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून त्यांना मिळत आहेत.**

जयसिंग भैय्या सोळंके हे धैर्यशील काका सोळंके यांचे चिरंजीव आहेत. खूप कमी वयामध्ये राजकारणाचे बाळकडू त्यांना आपल्या आजोबा कडूनच मिळालेले आहे. आजोबा लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी केवळ बीड जिल्ह्याचे राजकारण पाहिलेलं नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचं राजकारण त्यांनी जवळून पाहिलंय आणि अनुभवललय सुद्धा. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सुमारे 15 वर्ष ते विविध खात्याचे मंत्री राहिले. महसूल, बांधकाम सहकार, पणन एवढेच नाही तर उपमुख्यमंत्री पदासारख्या महत्त्वाच्या पदावर त्यांनी काम केलं. हे करत असताना त्यांनी कधीही आवड निवड केली नाही. त्यांच्या वागण्यात सर्वांना समान भाव होता. माजलगाव मतदार संघासह बीड जिल्ह्याच्या कल्याणासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले. मराठवाड्यातील भूमी पाण्याखाली येण्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी सिंचन प्रकल्प निर्माण केले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून त्यांनी हजारो गोरगरिबांच्या लेकरांना शिक्षक, प्राध्यापकाच्या नोकऱ्या वाटल्या. त्यांचं पवित्र कार्य हे शेवटपर्यंत चालतच राहीलं. शेवटी लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखान्याची निर्मिती करून त्यांनी या भागातील उजाड राणावर ऊस उत्पादन करून ऊसतोड शेतकऱ्यांना ऊस उत्पादक बनवलं. असे महान कार्य करणारे सुंदरावजी सोळंके साहेबाचे नातू असलेले जयसिंग भैय्या सोळंके यांनी आपल्या आजोबांकडून एवढा मोठा अनमोल राजकीय अनुभवांचा ठेवा आणि समाजसेवेचा वसा त्यांनी स्वीकारला आहे. आमदार प्रकाश दादा सोळंके, वडील धैर्यशील काका सोळंके यांनी देखील त्यांच्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत माजलगाव मतदार संघ आणि बीड जिल्ह्यात समाजसेवेचा वसा मागे 30-35 वर्षांपासून निभावलेला आहे. आपल्या वडिलांचं कर्तुत्व, नाव कधीही डागाळलं नाही पाहिजे याची काळजी या दोन्ही बंधूंनी नेहमी घेतली म्हणुनच आजही एक चारित्र्यसंपन्न नेतृत्व म्हणून प्रकाश दादा आणि धैर्यशील काका यांच्याकडे पाहिले जात आहे. अशा कुटुंबात जन्मलेले जयसिंग भैया सोळंके यांच्या माध्यमातून सुद्धा कर्तृत्व आणि युवा नेतृत्व आज फुलत आहे. खूप कमी वयात जयसिंग भैया सोळंके यांनी राजकारणात प्रवेश केला आहे. पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे सभापती यासारखे पद भूषवून त्यांनी बीड जिल्ह्यात आपल्या कर्तुत्वाची मशाल या अगोदरच तेवत ठेवलेली आहे. त्यातच लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पदाची त्यांना संधी मिळालेला आहे. शेतकरी सामान्य माणूस ते तळागाळातील जनतेचे प्रश्न सोडविण्याची कामगिरी जयसिंग भैय्या सोळंके आता करत आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जयसिंग भैया उमेदवार असतील असे खुद प्रकाश दादा यांनी जाहीर केले होते. त्यामुळे जयसिंग भैया सोळंके आता आमदार होणार या विचाराने या मतदारसंघातील तरुणांई अक्षरशः उड्या मारत होती. मात्र ऐनवेळी काही घडामोडी घडल्या आणि प्रकाश दादा यांना निवडणुकीत उभे रहावा लागले. मात्र चुलत्यांनी घेतलेल्या निर्णयाचं हसतमुख स्वागत जयसिंग सोळंके यांनी केल. आपण पाहतो महाराष्ट्रात अनेक चुलत्या पुतण्यांमध्ये राजकीय वादळ निर्माण झालेलं आहे. अनेक पुतण्यांनी चुलत्यांना सोडचिट्टी देऊन वेगळीच चूल मांडलेली आहे. मात्र जयसिंग भैया यांनी प्रकाश दादांच्या निर्णयाला विरोध केला नाही. आपल्या चुलत्यांचा घेतलेला निर्णय हा मला मान्य आहे. ते जे घेतील तो निर्णय माझ्यासाठी आदेश असेल असे मानून जयसिंग सोळंके पुन्हा कामाला लागले आणि प्रकाश दादांच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेतली. जयसिंग भैया सोळंके यांनी गावागावात जाऊन लोकांना कामाला लावलं आणि दादांच्या विजयामध्ये मोलाचे कामगिरी बजावली. ज्या पद्धतीने वडिलांनी प्रकाश दादांची सावली म्हणून काम केलं त्याच पद्धतीने पुतण्या जयसिंग भैयांनी आपल्या चुलत्याचा आधार होऊन या निवडणुकीमध्ये कर्तव्य बजावलं आणि म्हणूनच प्रकाश दादा यांचा विजय साध्य करता आला. जयसिंग सोळंके सारखा पुतण्या मिळणं यासाठी खूप भाग्य लागतं आणि नक्कीच प्रकाश दादा सोळंके भाग्यवान आहेत की त्यांना जयसिंग भैया सोळंके सारखा पुतण्या मिळाला. जो पुतण्या प्रकाश दादा यांच्या इमेज साठी स्वतःच्या जीवाचं रान करून घेत आहे. एवढ्या निष्ठेने वागणाऱ्या जयसिंग भैय्यासाठी मतदारसंघातील जनतेकडून, तरुणांकडून मनभरून आशीर्वाद मिळत आहेत. त्यांच्या आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांचे पूर्ण स्वप्न पूर्ण व्हावेत हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



**शब्दांकन**
**अशोक निपटे**

# जयसिंह सोळंके

## कुटुंबासाठी त्याग करणारा युवा नेता

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जयसिंग भैया सोळंके यांना विधानसभेची उमेदवारी जवळपास निश्चित झाली होती आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्यांना राजकीय वारस म्हणून जाहीरही केले होते त्यामुळे मतदारसंघात जयसिंग भैया सोळुंके हेच उमेदवार असल्याचे सांगण्यात येत होते मात्र ऐनवेळी प्रकाश दादा निवडणुकीत उभा राहिले आणि जयसिंग भैया सोळंके आता काय निर्णय घेतील याविषयी तर्कवितर्क लावले जात होते. महाराष्ट्रात अनेक पुतण्यांनी आपल्या चुलत्यांसोबत सोडचिट्टी घेऊन निवडणुकीत वेगळी चूल मांडलेली आहे. मात्र आपलं कुटुंब हे आपल्यासाठी श्रेष्ठ आहे दादा जो निर्णय घेतील तो निर्णय माझ्यासाठी आदेश असेल असा निर्णय भैय्यांनी घेतला. कुटुंबाला महत्त्व देणारा आणि स्वतः त्याग करणारा युवा नेता म्हणून जयसिंग सोळंके यांची ख्याती आता महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.

## जयसिंग भैयाना स्व. सुंदरराव साहेबांचे बाळकडू



लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीची ओळख संपूर्ण देशभरात केलेली होती. म्हणून राष्ट्राच्या उत्कर्षात मोलाची भर घालणारे व्यक्तिमत्व म्हणून सोळंके साहेबांना देश पातळीवरील स्वर्गीय इंदिरा गांधी सद्भावना पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. आपल्या आजोबांचं नाव विख्यात असल्यामुळे आजोबांच्या अंगाखांद्यावर खेळलेले जयसिंग भैया सोळंके यांना राजकारणाचे बाळकडू खुद सोळंके साहेबांनीच दिलेलं आहे सोळंके साहेबांच्या आदर्शावर वाटचाली करीत नातू जयसिंह सोळंके यांनी आता आपल्या राजकारणाची दमदार एन्ट्री माजलगाव मतदारसंघात केली आहे गावागावात कामाच्या माध्यमातून त्यांनी आजोबा लोकनेते सोळंके साहेब आणि चुलते प्रकाश दादा आणि वडिल धैर्यशील काकांच्या पावलावर पाऊल टाकित यशस्वी वाटचाल सुरु आहे.

## मदतीला धावणारा युवा नेता

जयसिंग भैया सोळंक हे अडचणीत सापडलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याला मदतीला धावून जातात. त्याच्यावरचे संकट दूर करण्यासाठी ते जीवाचं रान करतात. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी संकटातून उभा केलं आहे. आपला कार्यकर्ता सुखी तर आपण सुखी यासाठी ते नेहमी प्रयत्न करत असतात. सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजुरांना मदत करणारे कार्यकर्ते त्यांना आवडतात. आणि अशा कार्यकर्त्यांच्या पाठीमागे ठामपणे उभा राहण्याची भूमिका ते नेहमी घेतात म्हणून जयसिंग सोळंके हे कार्यकर्त्यांच्या गळ्यातील ताईत म्हणून गणले जात आहेत.



**नगर पंचायत, वडवणी, जि.बीड**

**जाहिरनामा**

दि.२९/१२/२०२४ फा.क्र.७३/२०२४

अर्जदाराचे नाव १) **श्री. किरण मुक्तीराम उजगरे**

विक्री किया नावे करुन देणा-याचे नाव १) **श्री. मुक्तीराम साहेबराव उजगरे**

**प्रकरण :** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं. गट क्र. प्लॉट नं. मिळकत क्र.२५९ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार : पूर्व-पश्चिम २४ फुट. व दक्षिणोत्तर ३२.५ फुट एकुण क्षे. ७८० चौ.मी. पुर्व-पश्चिम २४ फुट. व दक्षिणोत्तर ३२.५ फुट एकुण क्षे. ७८० चौ.मी. (सामाईक)

पूर्वः- भगवान उजगरे, पश्चिमः- भगवान मसा दक्षिणः- १५ फुट रस्ता, उत्तरः- कोंडीराम उजगरे

पुर्वः- लिहुन देणार यांची उर्वरीत जागा, पश्चिमः- भगवान मसा, दक्षिणः- १५ फुट रस्ता, उत्तरः- कोंडीराम उजगरे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा, मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

**नगर पंचायत, वडवणी, जि.बीड**

**जाहिरनामा**

दि.२९/१२/२०२४ फा.क्र.७४/२०२४

**अर्जदाराचे नाव १) श्रीमती, संजवनी श्रीकृष्ण जाधव**

विक्री किवा नावे करुन देणा-याचे नाव १) **श्री. रोहीदास रघुनाथ पवार**

**प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं. गट क्र.४२६ प्लॉट नं.३४ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

आकारः पुर्व-पश्चिम १२.०० मी. व दक्षिणोत्तर ०७.५० मी एकुण क्षे.९०.०० चौ.मी.

पूर्वः- रस्ता, पश्चिमः- प्लॉट नं. २७, दक्षिणः- प्लॉट नं. ३५, उत्तरः- प्लॉट नं. ३३

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा, मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

**नगर पंचायत, वडवणी, जि.बीड**

**जाहिरनामा**

दि.२९/१२/२०२४ फा.क्र.७५/२०२४

**अर्जदाराचे नाव १) श्रीमती, राणबाई मस्साजी गायकवाड**

विक्री किवा नावे करुन देणा-याचे नाव १) **श्री. बाळु सदाशिव पटादंत २) श्री. सचिन सदाशिव पटाईत**

**प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.४१६ प्लॉट नं. ३६ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

**आकारः** लांबी पूर्व-पश्चिम उत्तरबाजुने १४.४० मी. व पुर्वपश्चिम दक्षिणबाजुने १४.७० मी व रुंदी दक्षिणोत्तर ०७.२५ मी. एकुण क्षे.१०९.११ चौ.मी.

पूर्वः- गट नं. ४१५, पश्चिमः-०९ मीटर रस्ता,दक्षिणः-प्लॉट नं. ३७, उत्तरः- प्लॉट नं. ३५

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**


• माजलगाव मतदार संघाचे किंग मेकर •
मा.श्री जयसिंग भैय्या सोळंके
आपणांस उदंड
आयुष्याच्या अनंत शुभेच्छा.!
शुभेच्छुक : राष्ट्रवादी युवक काँग्रेस वडवणी तालुका